विशेष सहाय्य योजनेच्या निकषात
सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : विसयो-२०२५/प्र.क्र.९२/विसयो
मंत्रालय, मुंबई-०३२ ४००
दिनांक: १९ जून, २०२६.

वाचा :-

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०१८/प्र.क्र.६२/विसयो, दिनांक २०.०८.२०१९,
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२५/प्र.क्र.९२/विसयो, दिनांक २७.०३.२०२६.
३. दिव्यांग सक्षमीकरण विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२६/प्र.क्र.३३/कार्यासन-१, दिनांक १७.०६.२०२६.

**शासन शुध्दीपत्रक :-**

विशेष सहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना राबविण्यात येतात. त्यानुषंगाने विशेष सहाय्य योजनेच्या निकषात विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये "**तात्पुरत्या स्वरुपात दिव्यांग असलेली व्यक्ती विशेष सहाय्य योजनेसाठी पात्र असणार नाही. दिव्यांग लाभार्थ्यांना विशेष सहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी युनिक डिसॅबिलिटी आयडी ( Unique Disability ID Card ) कार्ड अनिवार्य करण्यात येत आहे**", अशी तरतूद करण्यात आली आहे. आता संदर्भ क्र.३ येथील दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या शासन निर्णयान्वये विशेष सहाय्य योजनेंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांसंदर्भात केलेली सुधारणा विचारात घेता, या विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

**"ज्या दिव्यांग लाभार्थ्यांकडे सक्षम वैद्यकीय प्राधिकरणाने निर्गमित केलेले वैध तात्पुरते दिव्यांगत्व प्रमाणपत्र (Temporary UDID Card) उपलब्ध आहे, अशा लाभार्थ्यांना त्यांच्या प्रमाणपत्राच्या वैधतेच्या कालावधीपर्यंत (Period of Validity) विशेष सहाय्य योजनेचा लाभ सुरु ठेवण्यास, याद्वारे मान्यता देण्यात येत आहे".**

२.	तसेच सर्व संबंधितांनी दिव्यांग लाभार्थ्यांच्या पात्रतेसाठीचे निकष, अटी व शर्ती यासंदर्भात दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या शासन निर्णयाचे अवलोकन करणे आवश्यक राहील.

३.	सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०६१९१७१९१८८३२२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.06.19 17:20:55 +05'30'

**( विवेक शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव/ सचिव
३. मा. उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव/ सचिव
४. मा.मंत्री, विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव
५. सर्व जिल्ह्यांचे पालक मंत्री
६. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव
७. सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
८. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
११.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषि भवन, नवी दिल्ली
१२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.सचिव, दिव्यांग सक्षमीकरण विभाग विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५.संचालक, नागरी प्रशासन, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
१६.संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई
१७.वित्त विभाग (व्यय-१४ / अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१८.सर्व मंत्रालयीन विभाग/सर्व विभागीय आयुक्त /सर्व महापालिका आयुक्त/सर्व पोलीस आयुक्त
१९.सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक / सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२०.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२१.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२३.विभागीय समाजकल्याण अधिकारी ( मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर)
२४.सर्व उप विभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व तहसिलदार
२५.सर्व कोषागार अधिकारी / सर्व उप कोषागार अधिकारी
२६.सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
२७.सर्व अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२८.निवड नस्ती, विसयो